International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: ..., Available online at: www.ijaresm.com
Volume 10, Issue 3, March -2022, Impact Factor: 7.429, Available online at: www.ijaresm.com

# यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य

डॉ .नामानंद गौतम साठे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा संशोधक मार्गदर्शक
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद .

---

**प्रस्तावना**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला गती आणि दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. म्हणूनच त्यांना आपण सर्वजण महाराष्ट्राचे शिल्पकार असे म्हणतो .शेती , सहकार, उद्योग, ऊर्जा निर्मिती, परराष्ट्र धोरण, अशा विविध क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा उमटविला .भाऊसाहेब हिरे यांना विरोध करून मिळवलेले मुख्यमंत्रिपद तसेच भारताचे उपपंतप्रधान ,अर्थमंत्री, संरक्षणमंत्री ,परराष्ट्रमंत्री या सर्वातून त्यांच्या राजकीय कार्याचा आढावा आपणास पुढीलप्रमाणे घेता येईल.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

1. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाचा मागोवा घेणे
2. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कार्याचा आढावा घेणे
3. केंद्रामध्ये संरक्षणमंत्री, गृहमंत्री, व परराष्ट्रमंत्री उपपंतप्रधान, अर्थमंत्री अशा विविध पदावरील त्यांनी भूषवलेल्या भूमिकेचा अभ्यास करणे.
4. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:-** सदर शोधनिबंध तयार करण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ , वर्तमानपत्रातील लेख तसेच प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे व वैज्ञानिक संशोधन पद्धतीचा अवलंब या ठिकाणी करण्यात आला आहे. **यशवंतराव चव्हाण यांचा जीवन परिचय** :- यशवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च 1914 रोजी मु .पो. देवराष्ट्रे ता. खानापूर जिल्हा. सांगली येथे झाला त्यांच्या वडिलांचे नाव बळवंतराव चव्हाण होते त्यांचे मूळ गाव भाळवणी होते त्यांच्याकडे चार पाच एकर कोरडवाहू जमीन होती त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती यशवंतराव चव्हाण यांचे मुळगाव ढवळेश्वर पुढे ते भाळवणी येथे स्थायिक झाले .बळवंतराव यांचे आजोबा विलिफ म्हणून नोकरी करत असताना बळवंतराव यांची बदली कराडला झाली आणि कराड हे त्यांचे गाव झाले .यशवंतराव यांच्या आई देवराष्ट्रे येथील दाजीबा घाडगे यांच्या भगिनी होत्या. आईचे नाव विठाबाई होते बळवंतराव व विठाबाई या जोडप्यास अनुक्रमे ज्ञानोबा , राधाबाई ,गणपतराव, यशवंतराव अशी चार अपत्ये होती . कमी जमीनीतून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाच्या आधारे सहा जणांचे कुटुंब चालवणे , शक्य न झाल्यामुळे बळवंतराव विटा येथे उदरनिर्वाहासाठी बाळवणी येथून स्थलांतरित झाले पुढे 1918 च्या प्लेगच्या साथीत त्यांचे निधन झाले .कुटुंबाची आर्थिक स्थिती बेताची असतानादेखील यशवंतराव देवराष्ट्रे येथील शाळेतून चौथीची परीक्षा पास झाले.

Scanned by CamScanner

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March -2022, Impact Factor: 7.429, Available online at: www.ijaresm.com

यशवंतराव चव्हाण 1941 मध्ये कायद्याचे पदवीधर झाले .2 जून 1942 रोजी त्यांचा विवाह फलटणच्या मोरे कुटुंबातील वत्सल अशा वेणूताई यांच्याशी झाला. 1940 ते 1945 च्या दरम्यान सातारा जिल्हा हा राजकिय क्षेत्रात कार्य करणा-याचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध झाला .कारण सातारा जिल्ह्यामध्ये क्रांतिकारकांचे कार्य क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सरकारने ब्रिटिशांची सातारा जिल्ह्यातील सत्ता उलथवून टाकली .सातारा जिल्ह्याचा इतिहास हा खऱ्या अर्थाने क्रांतिकारकांचा इतिहास आहे .पुढे घरची परिस्थिती बिघडल्याने त्यांना वकिली हा व्यवसाय सुरु करावा लागला. 1946 मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत यशवंतराव चव्हाण दक्षिण सातारा विधानसभा मतदारसंघातून के .डी .पाटील , व्यंकटराव पवार, बाबुराव गोखले यांच्यासह विजयी झाले. यशवंतराव चव्हाण यांची राजकीय कारकिर्द खऱ्या अर्थाने 1946 च्या निवडणुकीपासून सुरु झाली विधानसभेसाठी निवडून आल्यानंतर मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी यशवंतराव चव्हाण यांचा मंत्रिमंडळात समावेश केला नाही. यशवंतराव चव्हाण यांचा मंत्रिमंडळात समावेश न करता मोरारजी देसाई यांच्या गृह खात्यामध्ये संसदीय सचिव म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. 1952 मध्ये मुंबई राज्यात झालेल्या विधानसभेच्या पहिल्या निवडणुकीमध्ये शेतकरी कामगार पक्ष पराभूत झाला. आणि महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे उमेदवार मोठ्या प्रमाणात विजयी झाले .यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता .पंडित नेहरूंचा महाराष्ट्र दौरा सुरु असताना यशवंतराव यांच्यावर विरोधी पक्षाकडून झालेली टीका सहन करूनही यशवंतराव यांनी द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री पद सांभाळले. हे पद सांभाळत असताना त्यांच्यावर खलनायका सारखी टीका करण्यात आली. त्यांचा अपमान करण्यात आला. तरीदेखील त्यांचा त्यांनी सुसंस्कृतपणा सोडला नाही. संयम मनाशी बाळगून महाराष्ट्रातील जनतेच्या भावना किती प्रद्द आहेत हे पटवून दिले व स्वतंत्र महाराष्ट्राची निर्मिती करण्यामध्ये मोलाची भूमिका पार पाडली .

स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना 1 मे 1960 ला झाल्यानंतर त्यांनी संरक्षण मंत्री पद करण्यापर्यंत मध्यंतरीच्या काळात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले .यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण , सहकार ,पाटबंधारे, कृषि, उद्योग ,सत्तेचे विकेंद्रीकरण, हे निर्णय महाराष्ट्राच्या आर्थिक विकास घडवून आणण्यास महत्त्वपूर्ण ठरले आहेत. याचा मागोवा पुढील प्रमाणे आपणास घेता येईल.

1. दुर्बल घटकांच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना हाती घेतल्या.
2. शिक्षणाचा विकास झपाट्याने व्हावा म्हणून मराठवाडा विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली.
3. राज्याच्या विकासातील प्रादेशिक असमतोलाचा विचार करून पंचायत राज पद्धतीचा विकासासाठी जिल्हा परिषदेची निर्मिती केली.
4. 1961 मध्ये नवीन लेखकांना प्रेरणा मिळावी आणि मराठी भाषेत दर्जेदार ग्रंथ निर्माण व्हावे म्हणून साहित्य व सांस्कृतिक मंडळाची स्थापना त्यांनी केली.
5. प्रशासन भ्रष्टाचारमुक्त व्हावे म्हणून मूलभूत स्वरूपाचे निर्णय घेतले.
6. मागास भागाच्या विकासासाठी सर्वांगीण विकास कार्यक्रम तयार करून त्याच्या अंमलबजावणीचा प्रयत्न केला.
7. शिक्षण व आरोग्य यांची सोय ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

**संरक्षण मंत्री:-**

1962 मध्ये हरलेल्या सैनिकांचे मनोधैर्य उंचावण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांना प्राधान्य देण्यात आले .त्यांची संरक्षणमंत्री म्हणून निवड करण्याचा निर्णय नेहरूंनी घेतला. दरम्यान ...5 नोव्हेंबर 1962 ला नेहरू यांनी यशवंतराव यांना फोन करून संरक्षणमंत्री पद स्वीकारण्याबाबत हो किंवा नाही या दोन शब्दात उत्तर मागितले यावर त्यांनी होकार दिला. दिनांक 14 नोव्हेंबर 1962 ला भारताचे नवे संरक्षणमंत्री म्हणून त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षणमंत्री झाल्यावर जे कार्य केले त्याचा मागोवा पुढील प्रमाणे आपणास घेता येईल.



Scanned by CamScanner

1. यशवंतराव चव्हाण यांनी काश्मीर , राजस्थान, गुजरात व सीमा भागांना भेटी दिल्या तेथील अधिकारी आणि जवान यांच्याशी चर्चा करून त्यांचे प्रश्न आणि समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला.
2. लष्कर आणि संरक्षण मंत्रालयात संघर्षाची कारणे शोधली.
3. लष्कर आणि संरक्षण मंत्रालयात समन्वय साधण्यासाठी उपायोजना केल्या.
4. भारतीय लष्कराची कच्चे दुवे आणि कमतरता शोधून काढल्या.
5. लष्करी अधिकाऱ्यांना विश्वासात घेतले.
6. लष्कर आणि संरक्षण मंत्रालयात कौशल्य आणि संयमाने समन्वय साधून त्यांच्यात एकी निर्माण केली.
7. पहिले संरक्षण विषयक धोरण व पंचवार्षिक योजना तयार करून भारतीय बनावटीची लढाऊ विमाने वैजंता रणगाड्याचे उत्पादन इत्यादी महत्त्वपूर्ण कार्य केले.
8. भारतीय सीमाभागात सैन्याची ने-आण करण्यासाठी रस्ते बांधले संरक्षण विषयक प्रश्नाबाबत संसदेला विश्वासात घेतले.

**अर्थमंत्री:-**

व्ही. व्ही गिरी यांची राष्ट्रपती पदी नियुक्ती झाल्यानंतर 26 जून 1970 ला श्रीमती इंदिरा गांधींनी गृहखाते स्वतःकडे घेऊन स्वतःकडील अर्थखाते यशवंतराव चव्हाण यांच्याकडे सोपवले ते देशाचे 11 वे अर्थमंत्री झाले. त्यांनी संसदेमध्ये अर्थसंकल्प सादर केला या सर्व परिस्थितीत अर्थमंत्री म्हणून यशवंतराव यांनी घेतलेले महत्त्वाचे निर्णय आपणास पुढील प्रमाणे सांगता येतात.

1. देशातील महागाई नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले.
2. कृषी क्षेत्राचा विस्तृतपणे अभ्यास करून अर्थ मंत्रालय पातळीवर निर्णय घेतले.
3. आर्थिक क्षेत्रातील मक्तेदारी चा अभ्यास आणि उपाययोजना या संदर्भात एका आयोगाची नियुक्ती केली.
4. आर्थिक क्षेत्रासंदर्भात अनेक महत्त्वाची कायदे मंजूर करण्यात आले.
5. रोजगार निर्मितीच्या अनेक योजना जाहीर केल्या.
6. विदेशी चलनावरील नियंत्रणे आणखी वाढविण्यात आले.
7. गरिबी हटाव योजनेचे पूर्वक निर्णय आणि आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला.
8. देशातील कर्ज त्यांचे प्रमाण वाढवून करचुकवेगिरी वर नियंत्रण ठेवले.

## सारांश

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री तसेच केंद्रामध्ये संरक्षण मंत्री अर्थमंत्री म्हणून जे कार्य केले आहे ते निश्चितच देशाच्या हितासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी उपयोगाचे आहे विशेषता चिनी आक्रमणानंतर खचलेल्या भारतीय सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी जे त्यांनी प्रयत्न केले. त्याबद्दल हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला असे विश्लेषण त्यावेळेस करण्यात आले एकंदरीतच यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या राजकीय कार्यामुळे केवळ महाराष्ट्राचीच नाही तर संबंध भारत देशाची प्रगती झाली आहे असे म्हटल्यास काही अतिशयोक्ती ठरत नाही असे संशोधकास वाटते .

## संदर्भ ग्रंथ

1) चव्हाण यशवंतराव:- कृष्णाकाठ, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे.
2) भोळे भास्कर लक्ष्मण :- यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य ,साकेत प्रकाशन, पुणे.
3) महाराष्ट्र टाईम्स:- समृध्द महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण ,मुंबई, आवृत्ती 22 नोव्हेंबर 2007.

Scanned by CamScanner

4) जोशी रामभाऊ :- यशवंतराव एक इतिहास, प्रतिमा प्रकाशन, परभणी .
5) माने लक्ष्मण:- यशवंतराव आठवणी ,ग्रंथाली' प्रकाशन ,मुंबई.

Scanned by CamScanner